महायुतीचे
विधान केलं
यमंत्री शिंदे
र स्वतःच्या
ठीत खंजीर
केले.

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. १७ नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

# राजकारणात प्रवेश करुन 'नंबर दोन'चे धंदे करणाऱ्यांची 'कुंडलि'च मतदारांनी ओळखली

## असल्या नंबर दोन चे धंदे करणाऱ्यांना आमदार करून बीडचा विकास कधीच होणार नाही

दिव्य वार्ता

## मतदारांनीच या उमेदवाराला 'निब'वर टाकले

बीड, (दिव्य न्युज):- गेल्या काही वर्षापासून राजकारणाचा खेळच बदललेला आहे. कोणत्याही एखाद्या पक्षात प्रवेश करायचा त्या पक्षाची मोठी जबादारी घ्यायची आणि त्या मिळालेल्या जबाबदारीचा गैर फायदा उचलत जनतेचे कामे कमी आणि नंबर दोनचे धंदे जास्त करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. मग ते वाळूंचा धंदा असो, गुटख्याचा धंदा असो की पत्त्याचे क्लब असो किंवा सावकारी असो असे एक ना अनेक गैर कामे करून करोडो रूपयांची जंगम मालमत्ता जमा करून त्या पैशावरून रूबाबात राहुन राजकारण करणाऱ्यांची संख्यावाढत असून असल्या फालतूगिरी करणाऱ्यांची कुंडलि बीडच्या मतदारानी ओळखली असून असल्या उमेदवाराला निपाणी वर टाकत बीडच्या मतदारांनी साफ नकारल्याचे चित्र बीड विधानसभा मतदार संघातून दिसून येत आहे.


प्रतिकात्मक

राजकारण आणि समाजकारणाच्या नावाने गैरकामे करणाऱ्या आणि नंबर दोनचे धंदे करणाऱ्या पुढाऱ्यांची आता या निवडणूकीत खैर नाही मतदारांनी सुरूवातीपासूनच यांना नकारले असून असल्या नंबर दोनचे धंदे करणाऱ्या उमेदवारांची कुंडलि मतदारांनी चांगलीच ओळखली असून असल्या उमेदवाराला हजारांच्या आसपासही मतदानही पडणार नाही असे काहींसे चित्र बीड विधानसभा मतदार संघात पहावयास मिळत आहे.या पक्षातून त्या पक्षात आणि त्या पक्षातून अपक्षात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची कुंडलि ही अनेक पक्षांनी बघितली आहे. दोन्ही पक्षातून हकालपट्टी झालेल्या या अपक्ष उमेदवाराला बीडच्या मतदारांनी नाकारून दिले आहे कोणत्या तरी तिसरी बिघाडी... आघाडीकडून कोणाच्या तरी मेहरबानीवरून निवडणूकीत लढवित असलेल्या या अपक्षाला मतदारांनी साफ नाकारले असून या उमेदवारांना हजारांच्या आसपासही ▶▶ पान २ वर

## बीड मतदार संघाच्या विकासासाठी आ.संदीप क्षीरसागरांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा

### माजी सभापती जलिल खान पठाण यांचे आवाहन



बीड, (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदार संघातआपल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात अनेक विकास कामे करणारे विकासाची जाण असणाऱ्या बीड विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संदीपभैय्या क्षीरसागर यांना प्रचंड मताधिक्य देवून दुसऱ्यांना बीड विधानसभा मतदारसंघात दर्जेदार विकास कामे करण्यासाठी निवडून द्यावे असे आवाहन बीड नगर पालिकेचे माजी सभापती जलिल खान पठाण यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

पत्रकात पुढे म्हंटले आहे की आज राज्यात जातीयवादी शक्तींनी तोंडवर काढले असून या शक्तीकडून अल्पसंख्याक समाजाला टार्गेट करण्यात येत आहे. राज्यात महाआघाडीच्या ▶▶ पान २ वर

## बीडमध्ये शाहूनगर,बालेपीरच्या कॉर्नर बैठकीत दिसला आ.संदीपभैय्यांचा करिश्मा

### आम्ही तुमच्यासोबत ;मतदारांनी दिला आ.संदीप भैय्यांना विश्वास

बीड, (दिव्य न्युज):- बीड मतदारसंघातील कामांची असलेली जाण आणि शहरासह गावोगावच्या ग्रामस्थांशी असलेला थेट संपर्क यामुळे या निवडणूकीत तरुण,युवक मित्र आ.संदीप क्षीरसागर यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहिले असून त्यांनीच निवडणूक हाती घेतल्याने जाईल तिथे आ.संदीप क्षीरसागर यांच्या लोकप्रियतेचा करिश्मा दिसून येत आहे. निवडणूक प्रचारार्थ आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील शाहुनगर व बालेपीर येथे कॉर्नर बैठक घेतली. याच बैठकीतून कार्यकर्त्यांनी 'संदीपभैय्या आम्ही तुमच्यासोबत असल्याचा विश्वास दिला. तसेच या दोन्ही ठिकाणच्या बैठकीत असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत ▶▶ पान २ वर



## अनिलदादा जगताप यांना महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेची साथ - नगरसेवक अमर शेख



बीड, (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदारसंघातील मनोज जरांगे पाटील प्रस्कृत उमेदवार अनिलदादा जगताप यांना महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचा पाठिंबा संस्थापक अध्यक्ष शेख अमर व पदाधिकारी यांनी २३० बीड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना पाठिंबा दिला.

पुढे बोलताना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अमर शेख यांनी सांगितले आतापर्यंत ज्यांनी सत्ता भोगली त्यांनी बीड मतदारसंघाचे वाटोळे केले.गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांवर टीका केली जात आहे. त्यातच बीड विधानसभेत सर्व पक्षांनी विस्थापिताना उमेदवारी न देता प्रस्थापित घराण्यातच दोन्ही पक्षांनी उमेदवारी दिलेली दिसून अली याच बीड विधानसभा मतदारसंघातील क्षीरसागर घराण्याची जुलमी राजवट संपवण्यासाठी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेनी अनिलदादा जगताप यांना पाठिंबा देऊन निवडून आण्याचा निर्धार सुद्धा करणारच असे अमर शेख यांनी सांगितलेफ्कार्यक्रमा प्रसंगी अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप, शामराव पढुळे, सुलतान बाबा, ऐड नजर खान, शेख नासिर, जयंत वाघ, शेख खदीर भाई, संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सेलू आंबा टोल नाक्यावर गोळीबार प्रकरणी रामकृष्ण बांगर सह पाच जणांवर पोलिसात गुन्हा दाखल

### संदीप तांदळे व अभय पंडित यांच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार सूरु

अंबाजोगाई , (दिव्य न्युज):-लातूर रोड वरील सेलू आंबा टोल नाक्यावर गोळीबार प्रकरणी रामकृष्ण बांगर सह पाच जणावर अंबाजोगाई ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून ज्यांच्यावर गोळीबार करण्यात आला ते संदीप तांदळे व अभय पंडित रा. काकडहिरा यांच्यावर स्वा रा ती रुग्णालयात उपचार सूरु आहेत.

या विषयी पोलीस सूत्रा कडुन प्राप्त माहिती अशी की बीड तालुक्यातील काकडहिरा येथील रहिवासी संदीप तांदळे व अभय पंडित हे दोन जन काल रात्री ८ वाजण्याच्या सुमारास स्कारपीओ मध्ये बसून बीड हुन लातूर कडे जात असताना अंबाजोगाई नजीक सेलू आंबा टोल नाक्यावर मागून येणाऱ्या एम एच ४४ टी ००११ या क्रमांकाच्या फॉर्च्युनर मधील व्यक्तीने त्यांचा पाठलाग करून तू नेकनूर पोलिसात आमच्यावर दाखल केलेला गुन्हा मागे घे म्हणत संदीप तांदळे व अभय पंडित यांच्यावर गोळीबार केला.यात या दोघांच्या ही पायाला गोळी लागल्याने ते जखमी झाले असून दोघांना स्वा रा ती रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसात दाखल फिर्यादी मध्ये रामकृष्ण बांगर, सौ सत्यभामा बांगर, बाळा बांगर सह पाच जणावर गु र न ३५२ /२०२४ कलम ३०७, आर्म ऍक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आसुन अधिक तपास पो उ नी अक्षय जगताप हे करत आहेत.या प्रकरणात आरोपीने वापरलेली बंदूक ही रिव्हॉल्वर होती की घावटी कट्टा होता या विषयी अधिक माहिती मिळू शकली नाही.

## सुलताना बाबांनी चालवली अनिलदादांची शिलाई मशीन

### अनेक ठिकाणी सुरू केला प्रचार , बाबांचे भाषण ऐकण्यासाठी होत आहे तुफान गर्दी

बीड, (दिव्य न्युज):-बीड विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणुन निवडणूक लढवित असलेले अनिल जगताप याच्या शिलाई मशीनने आता जोर धरला असून गेल्या दोन दिवसापासून मतदार संघात वेगळेच चित्र निर्माण झाले ▶▶ पान २ वर



## बीड नगर परिषदची अकार्यक्षमता पोलीस प्रशासनासाठी ठरतेयं डोकेदुखी!

### वाटसरू नागरिकांची कोण घेणार काळजी? - एस.एम.युसूफ़

बीड , (दिव्य न्युज):- शहरातील जुने एस.पी. ऑफिस कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर पोलीस प्रशासनाकडून लावण्यात आलेले सूचनाफलक पाहून बीड नगर परिषद ची उदासीनता, अनास्था, अकार्यक्षमता जशी नजरेत भरत आहे, तशीच ही बाब पोलीस प्रशासनासाठी डोकेदुखी ठरत असल्याचे ही दिसून येत आहे. मात्र यामुळे वाटसरू नागरिकांची काळजी ▶▶ पान २ वर




## भाजपला पाठिंबा दिल्याने उमेदवारास चाबकाने मारले: वंचितने तोंडाला काळे फासले

केज, (दिव्य न्युज :- केज मतदारसंघातील वंचित आघाडीचे पुरस्कृत उमेदवार सचिन चव्हाण यांनी मतदानाच्या चार दिवस आधी भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा दिला. त्यामुळे संतप्त झालेल्या वंचित आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अंबाजोगाईत चव्हाण यांच्या तोंडाला काळे फासून मारहाण केली. चाबकाचे फटके देण्याचा अमानुष प्रकारही केला.



याप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र या उमेदवाराचा पाठिंबा काढून घेण्यासाठी वंचितचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे यांनी पक्षाकडे तक्रार केली आहे ▶▶ पान २ वर

# ज्योतीताई मेटे यांच्या नियोजन शुन्यपणामुळे स्व.मेटेंचे नाव खराब होत असल्याची चर्चा

## अर्ध्यामतदार संघातही 'बॅटरीचा प्रकाश' पडला नाही



बीड, (दिव्य न्युज):-बीड विधानसभा मतदार संघात अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवित असलेल्या स्व.विनायकराव मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांच्या नियोजन शुन्य नियोजनामुळे स्व.मेटे साहेबांचे नाव खराब होत असल्याची चर्चा मतदार संघात होत आहे. सुरू असलेल्या प्रचारात मेटेताई ह्या पिछाडीवर असून उद्या प्रचार संपणार आहे. आज पर्यंत त्या मतदार संघातील अर्ध्या मतदारांपर्यंत बॅटरीचा प्रकाश पडलेला नाही त्यांच्या या नियोजनबध्द अर्धवट नियोजनामुळे त्यांना या विधानसभा निवडणूकीत किती मतदान होणार ही चर्चा सध्या बीड विधानसभा मतदार संघात जोरात सुरू आहे.

२०१४ साली आ.स्व.विनायकराव मेटे यांनी बीड विधानसभा निवडणूक लढविली अचानक त्यांना महायुतीकडून उमेदवारी मिळाली. प्रचाराला दिवसही कमी होते पण मिळालेल्या त्या वेळेत त्यांनी संधीचे सोने करत मोठ्या प्रमाणात प्रचार यंत्रणा राबविली आणि समोरच्या उमेदवाराला त्यांनी घाम फोडला होता. अवघ्या काही मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला होता. ज्योतीताई मेटे यांना वेळ मिळाला पण त्यांना त्या वेळेचे सोने करता आलेले नाही अशी काहीशी चर्चा मतदारात होत आहे. ग्रामीण भागाचे तर सोडाच शहरातही त्यांनी २-३ प्रभाग सोडले तर इतर प्रभागात त्या आत्तापर्यंत बॅटरीचा प्रकाश पोहचू शकला नाही. फक्त मोमीनपुरा भागात त्यांनी सभा झाली त्यावितिरिक्त त्यांची इस्लमामपुरा,भालदारपुरा, गांधी नगर, तेलगाव रोड, शहेंशाहनगर, झमझम कॉलनी, जुना बाजार, खासबागर,हत्तीखाना, कारंजा, अजिजपुरा, माळीगल्ली, आसेफ नगर, कटकटपुरा, बुंदेलपुरा, नेहरू नगर, तेरवी लाईन, राज गल्ली, सटवाई मैदान, नागोबा गल्ली, शिवाजी नगर, स्वराज्य नगर, धांडे नगर यासह शहातील अनेक भागात त्यांच्या बॅटरीचा प्रकाश तर सोडाच बॅटरीची हवा देखिल पोहंचली नसल्याचे मतदारात बोलले जात आहे अशा पध्दतीने निवडणूक लढविता येत नसेल तर सर्व स्व.विनायकराव मेटे यांचे काहींशी आदर्श डोळ्यासमोर ठेवून किंवा त्यांचे विचार आपल्या समोर मांडून आपण नियोजनबध्द या विधानसभा निवडणूकीत पाऊल ठेवले पाहिजे होते असे ही मतदारात बोलले जात आहे.

# फडणवीस VS शरद पवार VS नाना पटोले

## ‘व्होट जिहाद’ : पवारांचा ब्राह्मण समाज, पटोलेंचा संघावर निशाणा

मुंबई , (दिव्य न्युज):- मुस्लिमांनी मविआच्याच उमेदवारांना मतदान करावे, असे ऑल इंडिया उलेमा कौन्सिलचे प्रमुख नोमाणींनी आवाहन केले. हा व्होट जिहाद असल्याचा आरोप फडणवीसांनी केला. त्यावर शरद पवार म्हणाले की, पुण्याच्या कसबा पेठेत एक समाज भाजपला सातत्याने मतदान करतो. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, आरएसएसही धार्मिक संघटना आहे. ती भाजपचा प्रचार करते. त्याचे काय?

सत्ताधारी ज्या अर्थी हा विषय पुढे करत आहेत. याचा अर्थ आपल्याला यश मिळणार नाही, अशी खात्री त्यांना झाली आहे. म्हणूनच ते असा विषय बाहेर काढत आहेत. त्या समाजाची आम्हाला सवय झाली. पुण्यातील काही मतदारसंघांत विशिष्ट समाज भाजपलाच मतदान करतो. त्या समाजाची आम्हाला सवय झालीय. व्होट जिहाद हा शब्द वापरून देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे सहकारी एक प्रकारे या निवडणुकीला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करत आहेत.

कसबा मतदारसंघात भाजपलाच मतदान करणाऱ्या ब्राह्मण समाजावर पवारांनी निशाणा साधला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत मुस्लिमांनी मविआला मतदान केले. एखाद्या मतदारसंघात विशिष्ट समाजाने एखाद्या पक्षाला मतदान केले तर तो त्यांचा अधिकारच आहे. हा व्होट जिहाद नाही.

लोकसभेत भाजपला मतदान करणाऱ्या मुस्लिमांना शोधून काढा, त्यांचे दाणापाणी बंद करा, त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घाला, असे नोमाणींचे आवाहन आहे. मविआकडून मुस्लिम मतांचे ध्रुव्रीकरण, मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण करून कोणत्याही परिस्थितीत ही निवडणूक जिंकायची असे मविआने ठरवले आहे. व्होट जिहादचे सिपाह सालार राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले असल्याचे मौलाना नोमाणींनी मतदानाचे आवाहन करणाऱ्या व्हिडिओत सांगितले आहे.

मुस्लिम एकगठ्ठा मते मविआकडे वळतील, असे सांगून हिंदू मते महायुतीकडे खेचण्याचा प्रयत्न. धर्माचा वापर करून मविआतील तीनही घटक पक्ष व्होट जिहाद करीत आहेत. या देशाच्या इतिहासातील निवडणुकीत मुस्लिमांचे इतके लांगूलचालन यापूर्वी कधी पाहिले नव्हते.

एखादी मुस्लिम संघटना एखाद्या पक्षाला मतदान करण्यासाठी आवाहन करत असेल, तर यात गैर काय? आरएसएसही धार्मिक संघटना आहे. ती भाजपचा प्रचार करते. त्याचं काय? भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा म्हणतात की त्यांना आरएसएसची गरज नाही. मग आरएसएसचे लोक कशाला प्रचारासाठी मैदानात उतरतात? याचं उत्तर आधी फडणवीस यांनी द्यावं. आम्हाला संघटनेने दिलेल्या पत्रातील कोणत्या मागण्या मान्य कराव्यात हे ठरायचं आहे. जेव्हा जेव्हा निवडणूक येते तेव्हा तेव्हा भाजपचे नेते हिंदू-मुस्लिम करतात. पण ज्या वेळी ईद येते, त्या वेळी हेच नेते मुस्लिमांकडे जाऊन बिर्याणी खातात.



## मी समाजासाठी माझे कुंकू गमावले-डॉ.ज्योती मेटे

### माझ्या जीवनातील अंधकार बॅटरी टॉर्चला मतदान करून दूर करा

बीड,(दिव्य न्युज):- बीड मतदार संघातील लोकप्रिय महिला उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांना मतदारांचा वाढता प्रतिसाद मिळत असून काल त्यांची लिंबागणेश सर्कलची चऱ्हाटा पंचायत समिती गणाची जाहीर सभा चऱ्हाटा येथे पर पडली लोकनेते विनायकराव मेटे यांनी हयातीत केलेल्या कामाची पोचपावती म्हणून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा मतदारांनी निश्चय केला आहे. या सभेप्रसंगी डॉ. ज्योती मेटे भाऊक होत मी समाजासाठी आपलं कुंकू गमावलं आहे. या समाजाकडून फक्त एकच मागणी आहे जनतेने बॅटरी टॉर्च समोरील बटन दाबून माझ्या जीवनातील अंधकार दूर करावा आणि मझ्या पदरात मतदानाचे दान टाकावे आणि आपल्या साथीच्या जोरावर मी मतदार संघाचा अंधकार दूर करेल अशी भावनिक साद यावेळी त्यांनी घातली. मतदारसंघाच्या लोकप्रिय अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे या बॅटरी टॉर्च हे निवडणूक चिन्ह घेवून गावोगावी पोहचल्या आहेत. दररोजच्या जाहीर सभेना त्यांना जनतेचा प्रतिसाद मिळत आहे. लिंबागणेश सर्कलच्या चऱ्हाटा येथील सभेसाठी अभूतपूर्व गर्दी झाली होती . बीड मतदार संघात पसरलेला अंधार दूर करण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात बॅटरी टॉर्च निवडणूक चिन्ह घेऊन उतरले आहे. लिंबागणेश सर्कल मध्ये लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी अनेक विकास कामे केली आहेत. हा बालाघाट परिसर साहेबांना मानणारा आणि त्यांच्या विचारांचा आहे. आणि येथील जनता माझ्या झोळीत मताचे दान टाकल्याशिवाय राहणार नाही असाही विशास त्यांनी व्यक्त केला. प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद , जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, सचिन कोटुळे , कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडित माने, ड मनीषा कुपकर, बबनराव उबाळे, अबा येळवे, हरी भोसले आदी उपस्थित होते.

## आमदार संदीप क्षीरसागर यांना प्रचंड मतांनी विजयी करा - शेख सलीम

बीड (दिव्य न्युज):- आगामी विधानसभा निवडणुकीत येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी बीड शहरातील प्रभाग क्रमांक ८ व १७ मधून विद्यमान आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार संदीप क्षीरसागर यांना मोठ्या मतांची लीड देणार असे सामाजिक कार्यकर्ते शेख सलीम यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांनी प्रथमच बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. तत्पूर्वी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद चे सदस्य व सभापती म्हणून त्यांना राजकारणासह समाजकारणाचा अनुभव बऱ्यापैकी होता. त्यानंतर बीड नगर परिषद साठी गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काकू-नाना आघाडी निर्माण करून लढविलेल्या निवडणुकीत त्यांनी २१ जागा जिंकून दिल्या होत्या. पहिल्याच प्रयत्नात २१ नगरसेवक निवडून आणणे, हे काही येऱ्या गबाळ्याचे काम नव्हे. यावरून त्यांची नेतृत्व क्षमता जनतेच्या लक्षात आलीच होती. पक्षश्रेष्ठींना सुद्धा त्यांच्या क्षमतेची चुणूक दिसली म्हणून गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विधानसभेचे तिकीट दिले होते आणि पहिल्याच प्रयत्नात आमदारकीची निवडणूक लढवून संदीप क्षीरसागर यांनी मैदान मारत निवडणूक जिंकली आणि आमदार होऊन विधानसभेत थाटात पोहोचले होते. गेली पाच वर्षे आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी सर्वसामान्य कार्यकर्त्यांसह निस्वार्थ भावनेने त्यांच्यासोबत असलेल्यांना यथायोग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हेच धोरण काही स्वार्थी लोकांना भावले नाही आणि ते आमदार संदीप क्षीरसागर यांना सोडून गेले. यावेळी ज्या अफवा उडविल्या जात आहेत, त्यात काहीही तथ्य नाही. कारण संदीप क्षीरसागरांची ही निवडणूक यंदा सर्वसामान्य कार्यकर्त्यांने आपल्या अंगाखांद्यावर घेतली आहे. त्यांच्यासोबत कोणीच नाही म्हणणाऱ्यांना जेव्हा आमदार संदीप क्षीरसागर यांनी प्रचार सुरू केला तेव्हा त्यांच्यासोबत प्रत्येक परिसरात गेल्यानंतर कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य जनता जेव्हा शेकडो व हजारोंच्या संख्येने दिसू लागली तेव्हा टीका करणाऱ्यांचे दात घशात जाऊ लागले आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत स्थानिक पातळीवर मोठ मोठी नावे दिसत नसली तरी आमच्यासारखे सच्चे आणि पक्के कार्यकर्ते त्यांच्यासोबत आहेत. त्यांना आमच्या येथील प्रभाग क्रमांक ८ आणि १७ मधून त्यांना मोठे मताधिक्य मिळवून देणार असे सामाजिक कार्यकर्ते शेख सलीम यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



## अपक्ष उमेदवार साजन चौधरी यांचा संदीपभैय्यांना पाठींबा



**बीड : बीड विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून असलेले युवा नेते समाजसेवक साजन चौधरी यांनी काल इंडिया आघाडी पुरस्कृत महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप क्षीरसागर यांना आपला बिनशर्त जाहिर पाठींबा दिला आहे. काल झालेल्या एका जाहिर सभेत त्यांनी संदीप भैय्यां यांना आपला पाठींबा जाहिर केला. यामुळे संदिप क्षीरसागर यांची ताकद वाढली असून माझी सर्वांना विनंती आहे की, बीडच्या सर्वांगिण विकासासाठी आणि जातीयवादी शक्तींना रोखण्यासाठी धर्मगुरूंच्या आदेशाप्रमाणे महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप क्षीरसागर यांच्या तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना विजयी करावे असे आवाहन ही साजन चौधरी यांनी केले आहे.**

## मतदार संघाच्या विकासासाठी मुस्लीम समाजाने पवाराच्या पाठीशी उभे राहावे- सय्यद एजाज

गेवराई, (दिव्य न्युज):- गेवराई विधानसभा मतदार संघातील निवडणूकीचा कौल पहाता विद्यमान आमदार लक्ष्मण आण्णा पवार हे प्रचंड मताधिक्याने निवडून येणार आहेत. कारण त्यांनी गेवराई मतदार संधातील मुस्लीम समाजाच्या विकासासाठी अल्पसंख्यांक फंडातून व आमदार फंडातून शादीखाने, कब्रस्थान कंपाऊंड वॉल, मदरसा अनुदान, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुस्लीम मोहल्यातील रस्ते यासाठी तब्बल ५१ कोटी रुपायाचे विविध कामे केलेले आहेत. मतदार संघातील जनता दोन्ही पंडीतांना कंटाळलेले असून अमरसिंह पंडीत व विजयसिंह पंडीत हे मुस्लीम समाजाचा निवडणूकी पुरताच वापर करुन दिशाभूल करतात. भावनेच्या भरात बदामराव पंडीत ऐवजी विकासाभीमुख नेतृत्व व शांतता ठेवणारे श्री लक्ष्मण आण्णा पवार यांच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन माजी नगर परिषद सदस्य श्री सय्यद एजाज यांनी प्रतिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. प्रसिध्दी पत्रकात पुढे म्हटले आहे की, गेवराई विधानसभा मतदार संघातील आतापर्यंत अमरसिंह पंडीत व विजयसिंह पंडीत यांनी मुस्लीम समाजाच्या जीवावर आपले निवडणुकीतील डिपॉजीट वाचवण्यासाठी वापर केला आहे. समाजाचे प्रश्न न सोडवता ते प्रलंबीत ठेवून समाजाला वेठीस धरण्याचे काम केले आहे. या मुळे ही मुस्लीम समाज विकासापासून वंचीत राहीला आहे. यांचा मागील इतिहास पहाता प्रत्येक निवडणूकीमध्ये मेळावे घेऊन बाहेर जिल्हयातील नेते आणून, बिर्याण्याचारुन, कान टोचण्याचे काम या काळू बाळू जोडीने केलेले आहे. व मुस्लीम समाजामध्ये आपसात भांडणे लावून फुट पाडून बीडला चकरा मारावण्यास लावल्या आहेत. आणि अनेक वर्षापासून नोकरीचे आमीष दाखवून झुलवत ठेवले आहे. असा आरोप देखील पत्रकात करण्यात आला आहे.



पत्रकात शेवटी म्हटले आहे की, अमरसिंह पंडीतला मी मुस्लीम समाजातील निर्बुध्दीचे व निष्क्रीय कार्यकर्ते पदावर बसवून बुजगावण्यासारखे उभे केले आहेत. त्यांचा समाजासाठी काहीही उपयोग नाही. डॉ. एस. एस. पटेल यांच्या सारख्या मुस्लीम नेत्यांना गेवराई सोडून छ.संभाजीनगर ला जावे लागले आहे. मुस्लीम शेतकरी यांचे ऊसाचे राजकारण केले आहे. व जयभवानी चे कर्ज वाटप करुन मुस्लीम समाजाच्या व्यापाऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले आहे. यामुळे याची राजकीय कारकिर्द मुस्लीम समाजाला चांगल्या प्रकारे माहित असून कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई तालुक्यात कायम शांतता राखण्यासाठी व सर्व समावेशक विकासाच्या माध्यमातून मुस्लीम बहुसंख्य असलेल्या भाटअंतरवली, नंदपूर, कुरणपिंप्री, ब्रम्हगाव, आहेर वाहेगाव, आम्ला वाहेगाव, नाथापूर, वाकनाथपूर , माळापूरी, कामखेड, कानडा पिंपळगाव, तलवडा, उमापूर, तालखेड, टाकरवण इ. गावांना दळणवळणाची साधने उपलब्ध करुन दिली आहेत.

पान १ वरून

### राजकारणात प्रवेश

मतदान मिळणार नसल्याचे चित्र दिसुन येत आहे. स्वतःच्या गावातील मतदारांनीया अपक्षाची कुंडलि बघीतली. कुंडलि पाहिल्यानंतर या अपक्षाची कोणतीच खैर नसल्याचे चित्र पाहिल्यानंतर गावकऱ्यांनी या उमेदवाराला नकारले असून स्वतःच्या गावातही इज्जत जाण्याचे चित्र या उमेदवारांचे दिसून येत आहे. या अपक्ष उमेदवारांचे चिन्ह सात किरणाचे असतांनाही कोणताच उजेड या चिन्हाचे दिसुन येत नाही. त्या पेनची निब ही मुंडलेली असल्याची चर्चा मतदार संघात होतांना दिसून येत आहे.

### बीड मतदार संघाच्या

उमेदवारांना मतदान करून विजयी करावे असे आवाहन ही अनेक धर्मगुरूंनी केले असून त्यांच्या आदेशाचे पालन करत सर्व मतदारांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्या तुतारी वाजविणारा माणुस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. विरोधकांकडे कोणताच विकासाचा मुद्दा नसून फक्त मागील ३५ वर्षाचा विकासाचे काम केल्याचे दाखवून मत मागण्याशिवाय दुसरे काहीच नाही. मागील ३५ वर्षात विकासाच्या नावाने शहराला भकास करणाऱ्यांना मतदान न करता महाआघाडीचे उमेदवार संदीपभैय्या क्षीरसागर यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. माजी सभापती जलिल खान पठाण यांनी संपूर्ण शहरात मतदारांच्या गाठीभेटीवर लक्ष दिले असून प्रत्यक्षे गाठीभेटीवर भर देत मतदारांना तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबण्याचे आवाहन ते करत आहेत. त्यांच्या या गाठीभेटीमुळे संदीप क्षीरसागर यांची ताकद वाढली असून येणाऱ्या २० तारखेला सकाळी लवकर उठून आपल्या मतदान केंद्रावर जावून संदिप क्षीरसागर यांना मतदान करण्याचे आवाहन ही त्यांनी केले आहे.

### बीडमध्ये शाहूनगर,

प्रवेश खेला. आपण सर्वांनी येत्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोर बटन दाबून मला आपल्या सेवेची पुन्हा संधी द्यावी. तुम्ही सर्व जिवाभावाची माणसं माझ्यासोबत असल्यानेच आपला विजय निश्चित आहे असे प्रतिपादन याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडी व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांनी निवडणूक प्रचारार्थ शनिवारी (दि.१६) बीड शहरात विविध भागात कॉर्नर बैठका घेवून मतदारांशी संवाद साधला.याप्रसंगी ते बोलत होते. दरम्यान बीड विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रचाराच्या अगदी सुरुवातीपासून आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांच्यासह पक्षाच्या सर्व जेष्ठ मार्गदर्शक नेत्यांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला आहे. गावोगावी संवाद दौरे, कॉर्नर बैठका, प्रत्यक्ष गाठीभेटी घेत प्रचार पुर्ण करत मतदार बंधु-भगिणींसह वडिलधारी मंडळींचे आशिर्वाद घेतले.

शनिवारी आ.संदीप क्षीरसागर यांची शहरातील शाहूनगर आणि बालेपीर भागातील कॉर्नर बैठकीला सभेचे स्वरूप आले. जमलेल्या युवकांसोबत अतिशय उत्साह आणि जोषपूर्ण वातावरणात आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारांशी संवाद साधला.आपला बीड जिल्हा आणि बीड मतदारसंघ कायम आदरणीय शरदचंद्रजी पवार यांच्या भूमिकेसोबत,विचारांसोबत राहिलेला आहे. आता संघर्षाच्या स्थितीतही आपण त्यांच्यासोबत कायम राहण्याची भूमिका घेतलेली आहे. म्हणूनच पवारसाहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्षाचा व महाविकास आघाडीचा बीडचा अधिकृत उमेदवार म्हणून माझी उमेदवारी आहे. येत्या २० तारखेला आपण सर्वांनी अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी उपस्थित मतदार बंधूना केले.

शहरातील शाहूनगर येथे झालेल्या कॉर्नर बैठकीत जयदीप राऊत व बालेपीर येथील वसीम भाई यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे बीड विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष आणि महाविकास आघाडीचे बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांनी स्वागत केले. सर्व युवक,तरुण मित्रांच्या खांद्याला खांद्या लावून मतदारसंघात काम करेल असा शब्द आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी दिला.

### सुलताना बाबांनी

आहे. दुरंगी असणारी ही निवडणूक आता तिरंगी झाली असून मुख्य लढत अनिल जगताप व संदिप क्षीरसागर यांच्यातच होईल असे चित्र सध्या दिसत आहे. बीडची बुलंद आवाज ज्यांचे भाषण ऐकण्यासाठी प्रत्येक ठिकाणी नागरीकांची तोंबा गर्दी असते ते सुलतान बाबांनी आता अनिल जगताप यांच्या शिलाई मशीनचा प्रचार जोरात सुरू केला असून ठिक ठिकाणी होत असलेल्या प्रचार सभेला मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. सुलतान बाबा यांचे भाषण ऐकण्यासाठी मतदारांची तोंबा गर्दी होत असून त्यांचे भाषण ऐकून मतदारांच्या मनात अनिल जगताप यांची शिलाई मशीनने घर करून ठेवले असून येणाऱ्या २० तारखेला सुलतान बाबा यांच्या तुफानी भाषणामुळे शिलाई मशिनचे बटन मोठ्या प्रमाणात दाबल्याचे दिसून येईल आणि २३ तारखेला निकाल आल्यानंतर सुलतान बाबा यांची कमाल दिसून येईल.

### बीड नगर परिषद ची

कोण घेणार? असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड नगर परिषदेची उदासीनता, अनास्था आणि अकार्यक्षमतेमुळे बीड शहराच्या विस्तारानुसार आवश्यक असलेल्या मुतारी व संडास जागोजागी निर्माण करणे गरजेचे असताना या महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीकडे मात्र लक्ष देण्यात येत नाही. याकडे बीड नगर परिषद प्रशासनाचे अक्षम्य असे दुर्लक्ष आहे. यामुळे बशीरगंज चौक ते जिल्हा रुग्णालय या रस्त्यावर असलेल्या जुने एस.पी. ऑफिस येथे जिल्हा रुग्णालयात ये-जा करणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक निकडीच्या वेळी जुने एस.पी. ऑफिस च्या आवारात लघु शंका करीत होते. यामुळे या ठिकाणी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बिंदुसरा निवासस्थानी ये-जा करताना पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुतारीचा उग्रवास येत होता. तसेच गलिच्छता स्पष्ट दिसत होती. यामुळे वैतागून पोलीस अधिकाऱ्यांनी या जागी असलेल्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर मोठे सूचनाफलक लावले तसेच या मुतारीचा जाम वैताग आल्याने फक्त एका सूचना फलकावर समाधान न मानता चक्क मुख्य प्रवेशद्वारा बाहेर एक, मध्ये एक आणि अजून थोड्या अंतरावर एक असे तीन-तीन सूचना फलक लावले. त्यावर येथे लघवी केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल अशी तीन-तीन सूचना फलके आणि लांबलचक बॅरिकेट्स लावण्याची वेळ पोलीस प्रशासनावर का आली? तर याचे उत्तर आहे, बीड नगर परिषदेची उदासीनता, अनास्था आणि अकार्यक्षमता. बीड नगर परिषदेने आवश्यक संख्येत बीड शहरात जागोजागी मुतारी आणि संडास बांधले असते तर अशा प्रकारे तीन-तीन सूचनाफलक आणि बॅरिकेट्स लावण्याची वेळ पोलीस प्रशासनावर आली नसती. निगरगट्ट झालेल्या बीड नगर परिषदेने आता निदान पोलीस प्रशासनाच्या या कारवाईनंतर तरी आपल्या कार्यकर्तव्यात सुधारणा करावी. बीड शहरात आवश्यक तेथे मुतारी व संडासचे निर्माण करावे. जेणेकरून रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना निकडीच्या वेळी त्याचा वापर करता येईल. असे मतही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

### भाजपला पाठिंबा दिल्याने

केज मतदारसंघात अनिल डोंगरे यांनी वंचितकडून अर्ज दाखल केला होता. मात्र अर्जावर सूचक व अनुमोदक नसल्याने तो बाद झाला. त्यामुळे वंचित आघाडीने अपक्ष उमेदवार सचिन चव्हाण यांना पुरस्कृत केले. हा पाठिंबा घेताना वंचितचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे यांनी शंभर रुपयांच्या बाँडवर नियम व अटी सांगून लेखी घेत पक्षप्रवेश देऊन आयुष्यभर पक्षाचे काम करेन, इतर पक्षाशी हातमिळवणी करणार नाही, अशा अटी चव्हाण यांच्याकडून लिहून घेतल्या होत्या. त्यांना पक्षाचे कार्यालय व प्रचाराचे साहित्य दिले होते. परंतु चव्हाण यांनी वंचित आघाडीचे प्रचार साहित्य वापरले नाही.

अपक्ष उमेदवार सचिन चव्हाण यांनी भाजपच्या प्रस्थापित लोकांकडून पक्षनिधी म्हणून तीन लाख रुपये घेऊन हातमिळवणी केल्याची माहिती आम्हाला मिळाल्याचा दावा पक्षाचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे यांनी केला. त्या संदर्भात काही व्हिडिओही समोर आले होते. पक्षाचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांना धोका दिल्यामुळे उमेदवार चव्हाण यांना अंबाजोगाईतील रमाबाई आंबेडकर चौकात बोलावून घेत भरचौकात त्यांच्या तोंडाला काळे फासून चाबकाचे फटके देत निषेध नोंदवला.